# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 372/2023 दिनांक : 27.09.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 20.09.2023 रोजी चे 05.00 वा. चे सुमारास, **मिल्लतनगर चौरस्त्यावर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा नमाजासाठी जात असतांना यातील नमुद आरोपीने पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीचे डाव्या बरगडीत पाठीमागुन चाकु खुपसून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख इमतियाज शेख शादुल, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मिल्लतनगर गल्ली क्रं 12 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 694/2023 कलम 307, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोउपनि/**श्री हंबर्डे, मो.क्रं. 9823040224** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 15.09.2023 रोजी 21.30 ते 22.00 वा. चे दरम्यान, **मनोहर ज्वेलर्स दुकाना समोर वजिराबाद नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा सिडी डिलक्स कंपणीची काळया रंगाची मो. सा. क्रं एमएच–26/यु–3878 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी धिरज किशोर जोशी, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. माहेश्वरी भवन कौठा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 426/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1962 लोकडे, मो. क्रं. 7745001962** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 20.09.2023 रोजी 10.30 ते 11.00 वा. चे दरम्यान, **ग्रामीण पॉलीटक्नीकल कॉलेज विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्लेंडर प्लस कंपणीची काळया रंगाची मो. सा. क्रं एमएच–38/यु–7327 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी संजय सचिन नरवाडे, वय 27 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. समतानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 691/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/811 याल्लावार, मो. क्रं. 9923696860** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ

**1)विमानतळ :–** दि. 03.04.2020 चे 00.00 ते दिनांक 07.09.2023 रोजी चे 02.00 वा. चे दरम्यान, **हर्षनगर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईवर संशय घेवुन छोटे मोठे कारण काढुन फिर्यादीस नेहमी मारहाण करून माहेरहुन ॲटो घेण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये नाहीतर दुसरे लग्न करतो असे म्हणुन नेहमी शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व पहिली पत्नी असतांना आरोपी क्रं 2 सोबत दुसरे लग्न केला. फिर्यादीस थापडा बुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 318/2023 कलम 498(अ), 494, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2166 राठोड, मो.क्रं. 9823357541** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दि. 03.09.2019 रोजी पासुन ते दिनांक 10.09.2023 चे दरम्यान, **शक्तीनगर नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु आम्हाला पसंद नाहीस, तुला आम्हाला नांदवायचे नाही, तु एक लाख रूपये खर्चासाठी घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 35 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 304/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1207 बेडदे, मो.क्रं. 8888873282** हे करीत आहेत.

## 4)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**1)ईस्लापुर :–**दिनांक 26.09.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **इस्लापुर ते किनवट जाणाऱ्या रोडवर हरण खरब ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून दोन वाहनांत सहा गोवंश जातीचे जनावरे दाटी वाटी कोंबुन पायास बांधुन क्रुरपणे इजा होईल अशा पध्दतीने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री उमेश बालाजी भोसले, ने. पोस्टे ईस्लापुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरन 94/2023 कलम 34 भादवि सह कलम 11(1) प्राणी छळ प्रतिबंध अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री तोडेवाड, मो. नं. 8080308059** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :-

**शिवाजीनगर** :-दिनांक 26.09.2023 रोजी 01.10 वा. चे सुमारास, **सय्यद किराणा दुकान तेहरानगर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले कंबरेस दोन खंजर किंमती 1000/-रू चा घेवुन मो सा क्रं एमएच-26/सीजी-8262 किंमती 40,000/-रू वर एकुण 41,000/-रूपयाचे मालासाह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/मीलींद मधुकरराव सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 324/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1053 मठदेवरू, मो.क्रं. 9673545956** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिऊन आत्महत्या :-

**माहुर** :-दिनांक 25.09.2023 रोजी चे 19.30 ते दि. 26.09.2023 चे 11.00 वा. चे दरम्यान, **मौ. मालवाडा शिवारात ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अशोक भोपा जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. मालवाडा माहुर ता. माहुर जि. नांदेड**, यांनी सततचे नापीकीमुळे व अतिवृष्टीला कंटाळुन कर्ज बाजारी होवुन कोणतेतरी विषारी औषध पिऊन मरण पावला. वगैरे **खबर देणार मंगल भोपा जाधव, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. मालवाडा माहुर ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माहुर** आ. मृ. **27**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री राठोड, मो.नं. 8999149220** हे करीत आहेत.

## 7)पाण्यात बुडून मृत्यु :-

**नायगांव** :-दिनांक 26.09.2023 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **मौ. टाकळगाव शिवारातील विहीरीत ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे योगेश गंगाधर गिरी, वय 23 वर्षे, रा. टाकळगाव ता. नायगाव जि. नांदेड** हा बीएएमएसचे दुसरे वर्षास होता. दिनांक 24.09.2023 रोजी दुपारी दोन वाजताचे सुमारास घरून शेताकडे जाऊन येतो म्हणुन गेला तो परत आलाच नाही. त्याचा शोध घेतला असता तो दिनांक 26.09.2023 चे 08.00 वा. चे सुमारास टाकळगाव शिवारातील विहीरीतील पाण्यात बुडून प्रेत तरंगत असल्याचे मिळुन आले. वगैरे **खबर देणार दिगांबर दत्ता गिरी, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. टाकळगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगांव** आ. मृ. **21**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 व्ही. एम. मुस्तापुरे, मो.नं. 9325850996** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन आत्महत्या :-

**कुंटूर** :-दिनांक 24.09.2023 रोजी चे 08.00 वा. पुर्वी, **मौ. पाटोदा ता. कुंटूर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे ज्ञानेश्वर माधवराव शिंदे, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. पाटोदा ता. नायगाव जि. नांदेड**, हा शेतातील पिकाचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने बँक ऑफ इंडियाचे घेतलेले कर्ज कसे फेडावे या तणावातुन राहात्या घरी तुळईला साडीने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार विठ्ठल माधवराव शिंदे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. पाटोदा ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कुंटूर** आ. मृ. **26**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री. अटकरे, मो.नं. 8669182128** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड